अमित गद्रे




**शाहू पुरस्कार ...**

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा राजर्षी शाहू पुरस्कार बुधवारी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी डावीकडून आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, माजी महापौर सरिता मोरे, डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी दौलत देसाई आणि प्रा. डॉ. अशोक चौसाळकर.

▶▶ संबंधित वृत्त...२

लोकमत

## अण्णा हजारे : कोल्हापूरमध्ये शानदार सोहळ्यात राजर्षी शाहू पुरस्काराने सन्मान

# मी आणि माझं यापलीकडे विचार करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मी आणि माझं या पलीकडे जाऊन आपला गाव, समाज आणि देशाच्या भल्यासाठी पुढे आल्याशिवाय राजर्षी शाहू महाराजांचा परिवर्तनाचा वारसा पुढे चालवता येणार नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी बुधवारी येथे केले.

येथील शाहू स्मारक भवनात राजर्षी छत्रपती मेमोरिअल ट्रस्टच्या वतीने दिला जाणारा राजर्षी शाहू पुरस्कार अण्णा हजारे यांना शाहू छत्रपती यांच्या हस्ते प्रदान केला. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी महापौर सरिता मोरे, ट्रस्टचे अध्यक्ष जिल्हाधिकारी दौलत देसाई, आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, आदी उपस्थित होते.

एक लाख रुपये रोख, शाल, स्मृतिचिन्ह, मानपत्र आणि कोल्हापुरी फेटा असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरणावेळी सभागृहाने उभे राहून टाळ्यांच्या गजरात अण्णांच्या कार्याला सलाम केला. या सोहळ्यास शाहूप्रेमी लोक प्रचंड संख्येने उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर अण्णांनी 'भारतमाता की जय...!' अशी घोषणा दिल्यावर उपस्थितांच्या अंगावर शहारे आले. यावेळी ट्रस्टच्यावतीने डॉ. जयसिंगराव पवार संपादित शाहू गौरव ग्रंथ अण्णा हजारे यांना भेट देण्यात आला.




आदित्य वेल्हाळ

**कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनमध्ये बुधवारी समारंभात शाहू छत्रपती यांच्या हस्ते अण्णा हजारे यांना 'राजर्षी शाहू पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, महापौर सरिता मोरे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व जिल्हाधिकारी दौलत देसाई उपस्थित होते.**

हजारे यांनी छोटेखानी भाषणात समर्पकपणे सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. राज्यासह देश व जगभरात जाऊन अनेक पुरस्कार स्वीकारले; परंतु या पुरस्कारासारखा मनस्वी आनंद कुठेही मिळाला नसल्याचे सांगून हजारे म्हणाले, या पुरस्कारामुळे मला ८२ व्या वर्षीही समाजहितासाठी आणखी दोन पावले पुढे टाकण्याची शक्ती मिळाली. शाहू महाराजांनी सामाजिक परिवर्तनासाठी सारे आयुष्य वेचले. मी तेवढा मोठा नाही; परंतु त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालण्याचा प्रयत्न केला. समोर बसलेल्या तरुणाईला माझे आवाहन आहे, तुम्ही मी आणि माझं यापलीकडे जाऊन समाजाचा विचार करा. माझ्यासारखे सारे आयुष्य तुम्हाला समाजकामासाठी देता आले नाही तरी चालेल; परंतु रोज किमान एक तास समाजाच्या भल्यासाठी द्या. त्यातूनच परिवर्तन होणार आहे. शेतात पीक यायचे झाले तर एका दाण्याला मातीत गाडून घ्यावे लागते. तशी त्यागाची भावना बाळगा.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी समतेच्या परिभाषेचे पुनर्लेखन केले. त्यांनी समाजाचा विकास, समता, जलक्षेत्र, शिक्षण क्षेत्रासाठी केलेल्या कार्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या नावे अण्णांना दिला गेलेला पुरस्कार सयुक्तिक आहे.

कार्यक्रमाची सुरुवात राजर्षी शाहू गौरवगीताने झाली. शाहीर आझाद नायकवडी ग्रुपने गीत सादर केले. जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी प्रास्ताविकात शाहू महाराजांच्या चिरंतन स्मृती जपण्यासाठी स्थापन झालेल्या शाहू मेमोरिअल ट्रस्टने कोल्हापूरच्या सामाजिक चळवळीत मोलाचे योगदान दिले असून, शाहू स्मारक भवन चळवळीचे केंद्र बनले असल्याचे सांगितले. डॉ अशोक चौसाळकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. ट्रस्टच्या सचिव राणी ताटे यांनी मानपत्र वाचन केले. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. प्रशासनाधिकारी राजदीप सुर्वे यांनी आभार मानले. राळेगणसिद्धी, सांगली, सातारा, अहमदनगर येथील कार्यकर्ते मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

### पालकमंत्री अनुपस्थित

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या पुरस्काराचे वितरण होणार होते; परंतु सकाळी जयंतीच्या समारंभात उपस्थित राहून ते मुंबईला गेले. ढगाळ हवामानामुळे त्यांना प्रवासात अडचण आली. त्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांनी शुभेच्छा संदेश पाठविला. त्यात त्यांनी १०० वर्षांपूर्वी शाहू महाराजांनी पाण्याचे महत्त्व जाणले होते. त्याच धर्तीवर अण्णांना दिलेला पुरस्कार सयुक्तिक असल्याचे नमूद केले.

### सदसद्विवेकाचे रखवालदार

डॉ. चौसाळकर यांनी अण्णांचा परिचय करुन देताना त्यांनी लोकपाल, माहितीचा अधिकार या कायद्यांसाठी दिलेल्या लढ्याचा उल्लेख केला. गांधीवादी विचारांची कास धरत टोकाचा विरोध व संघर्ष पत्करुनही त्यांनी देशाच्या सदसद्विवेकाचा रखवालदार म्हणून (कॉन्शस कीपर ऑफ नेशन) काम केले, असे सांगितल्यावर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

दरम्यान, प्रेक्षकांनी सभागृह खचाखच भरले होते. अण्णांच्या चळवळीतील कार्यकर्ते 'मी अण्णा' लिहिलेल्या टोप्या घालून बसले होते. गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने मिनी हॉलमध्येही स्क्रीनची सोय केली होती.

## स्वच्छ कोल्हापूर बघून समाधान वाटले

- अण्णा हजारे म्हणाले, 'पूर्वी सभा, व्याख्याने, चळवळीच्या निमित्ताने अनेकदा कोल्हापूरला आलो आहे; पण यंदा येण्याचा अनुभव वेगळा होता. स्वच्छ कोल्हापूर बघून समाधान वाटले.' त्यांनी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी व महापौर सरिता मोरे यांचे अभिनंदन केले.
- ते म्हणाले, राष्ट्रहितासाठी १०० वर्षे पूर्ण केल्याशिवाय मरायचं नाही असं ठरवलंय. देशसेवा करता करताच मरेन. माझे बँक खाते नाही; परंतु करोडो रुपयांची विकासकामे केली. या पुरस्काराची रक्कमही स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधीकडे सुपूर्द केली जाईल.
- ते म्हणाले, मला एका संस्थेचा एक कोटीचा पुरस्कार जाहीर झाला होता; मात्र पुरस्कार देणारी संस्था व ज्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला जाणार होता, ते हातही स्वच्छ नव्हते, म्हणून पुरस्कार नाकारला; पण राजर्षी शाहू पुरस्कार देणारी संस्था व हात स्वच्छ असल्याने तो स्वीकारला.
- ते म्हणाले, परिवर्तनाच्या वाटेवर चालण्यासाठी चारित्र्य, विचार व आचार शुद्ध ठेवा, जीवन निष्कलंक ठेवा व थोडासा त्याग करा. कोट्यवधींची संपत्ती असलेल्याचे जीवन निष्कलंक नसेल, तर एअर कंडिशन रुममध्ये झोपेच्या गोळ्या घेऊन झोपावे लागते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUN 2019
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षणचे प्रवेश सुरू

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील सर्वच अभ्यासक्रमांची २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये बी.ए.. बी.काम.. एम.ए. भाषा (इंग्रजी. हिंदी. मराठी). एम.ए. सामाजिकशास्त्रे (इतिहास. राज्यशास्त्र. समाजशास्त्र. अर्थशास्त्र). एम.एस्सी. (गणित). पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या पदवी व पदव्युत्तर विषयांचा समावेश आहे. प्रवेशप्रक्रिया आनलाईन असून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हयातील ७७ अभ्यासकेंद्रांमध्ये विद्यार्थी. विद्यापीठाच्या अधिकृत लिंकवर प्रवेशाबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध आहे, अशी माहिती उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी दिली.

ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी स्वतःचा युजर आयडी व पासवर्ड तयार करुन रजिस्ट्रेशन करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता



**२५ जुलैपर्यंत प्रवेश अर्ज भरण्यास मुदत**

विद्यार्थ्यांनी निवडलेले अभ्यासकेंद्र हेच शक्यतो परीक्षा केंद्र म्हणून दिले जाते. प्रथम वर्ष नव्याने ऑनलाइन अर्ज सादर करताना ऑनलाइन शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी बँकेची कागदपत्रे सोबत ठेवणे गरजेचे आहे. संपूर्ण ऑनलाइन भरलेल्या अर्जाची प्रत अभ्यासकेंद्रावर नियमित शुल्कासह जमा करण्यासाठी २५ जुलैपर्यंत व विलंबशुल्कासह १० ऑगस्टपर्यंत तर २५ ऑगस्टपर्यंत अतिविलंब शुल्कासह मुदत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 JUN 2019

तरुण भारत

## शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे व प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून शाहू महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. आर. व्ही.गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. जे. एच. कराडे, डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. जे. एस. बागी, डॉ. पी. एस. पांडव, देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मु

# शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात बुधवारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, पी. डी. राऊत, एस. एस. महाजन, जे. एच. कराडे, एन. बी. गायकवाड, जे. एस. बागी, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, पी. एस. पांडव, देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे, आदी उपस्थित होते.

# 'स्वच्छ वारी, स्वस्थ वारी'त विद्यापीठाचे ७ हजार विद्यार्थी

## 'एनएसएस' बैठकीत निर्णय; वारी मार्गावर दररोज असणार एक हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आषाढी वारीत 'स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी, हरीत वारी' उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमांत शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) सात हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.



**कोल्हापूर : राष्ट्रीय सेवा योजनेच्या बैठकीत बोलताना. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत राजेश पांडे, अमित कुलकर्णी, डॉ. विठ्ठल बलशेटवार, डॉ. अतुल साळुंखे आदी.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, म्हणाले, वारी दरम्यान पथनाट्याद्वारे एक लाख वारकरी व गावकऱ्यांचे प्रबोधन केले जाणार आहे. ७०० टन ओला कचरा व निर्माल्य संकलन आणि ३५० टन सेंद्रिय खत निर्मिती करण्यात येणार आहे. ३५ लाख लिटर पाण्याची बचत करून डिटर्जंटयुक्त ३५ लाख लिटर प्रदूषित पाणी जमिनीत मुरण्यापासून वाचविण्यात येणार आहे. आरोग्य शिबिरातून हजारो वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येणार आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड यासाठी एकाच दिवशी एकाच जातीच्या २० हजार रोपांचे वाटप केले जाणार आहे. हरीत दिंडी व हरीत वारीसाठी वारी रस्त्यावर वृक्षांची लागवड व संगोपन उद्दिष्टे साध्य करणेकरिता विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

शिवाजी विद्यापीठाद्वारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यातील विविध ठिकाणी स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी, हरीत वारी या उपक्रमात विद्यापीठाचे एनएसएसचे दररोज एक हजार याप्रमाणे दि.१ जुलै ते दि. ७ जुलै या कालावधीत सात हजार विद्यार्थी सातारा जिल्ह्यातील पालखी विश्रांती आणि मुक्काम स्थळी कार्यरत राहणार आहेत. लोणंद, चांदोबाचा लिंब, तरडगाव, दत्त मंदिर काळज, सुरवडी, निभोरे ओढा, वडजल, विमानतळ - फलटण, विडणी, पिंपरद, निंबळक फाटा, बरड, साधूबुवाचा ओढा, धर्मपुरी पाठबंधारे बंगला, शिंगणापूर फाटा, पानसकरवाडी आदी ठिकाणी या विद्यार्थ्यांचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

सात दिवसांत दररोज एक हजार याप्रमाणे सात दिवसांत सात हजार विद्यार्थी प्रबोधनपर पथनाट्य, पर्यावरणपूरक पत्रावळ्यांचे वाटप, ओला कचरा व निर्माल्यांचे संकलन, हागणदारी मुक्तीसाठी शौचालयाचा वापर करण्यासाठी वारकऱ्यांना प्रवृत्त करणे, तसेच वृक्षारोपणाचा उपक्रम आयोजन करून निर्धारीत उद्दिष्ट साध्य करणेकरिता विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. या बैठकीला शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे कुलपती नियुक्त सदस्य अमित कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य सल्लागार समिती सदस्य डॉ. विठ्ठल बलशेटवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. अतुल साळुंखे आदी बैठकीला उपस्थित होते.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील तसेच व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी आणि इतर मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड व जिल्हा विभागीय समन्वयक तसेच कार्यक्रम अधिकारी यांची समूहाद्वारे कार्यवाही चालू आहे.

# शिवाजी विद्यापीठात शाहू जयंती उत्साहात

**कोल्हापूर (प्रतिनीधी) :** शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात झाली. मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी.पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार, डॉ.आर.व्ही.गुरव, डॉ. डी. के.गायकवाड, अधिष्ठाता डॉ.ए.एम.गुरव, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. एस. एस.महाजन, डॉ.जे.एच.कराडे, डॉ.एन.बी.गायकवाड, डॉ. जे.एस.बागी, डॉ.व्ही.एन.शिंदे, डॉ.पी.एस.पांडव, देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Estd: 1962
NAAC 'A' Grade

## दिव्यांगांसाठी
### रोजगार व कौशल्य मेळावा

दिव्यांगांसाठी कौशल्य व रोजगार मेळावा दि. २८ जून २०१९ रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत मानव्यशास्त्र इमारतीमध्ये आयोजित केला आहे. या मेळाव्यासाठी महाराष्ट्रातील नामवंत कंपन्या सहभागी होणार आहेत. या मेळाव्यामध्ये १२ वी उत्तीर्णापासून ते पदव्युत्तर पदवीधारकांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध केल्या जाणार आहेत. तसेच या मेळाव्यात वेगवेगळे कौशल्य व उद्योजकता विकास याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. **सदर मेळावा हा केवळ दिव्यांगांसाठीच आहे.**

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी ०२३१-२६०९३९८, २६०९२३९ या दूरध्वनीवर किंवा प्लेसमेंट ऑफिसर डॉ. जी. एस. राशीनकर भ्रमणध्वनी क्र. ९८२३११३२६९ वर संपर्क साधावा.

दि. २७/०६/२०१९ **प्रा. (डॉ.) विलास द. नांदवडेकर**
**कुलसचिव**

Kolhapur Edition
27 Jun, 2019 Page No. 11
Powered by : erelego.com



कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी उपस्थित कुलगुरू डॉ. देवानंद शिंद, प्र– कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.

# विद्यापीठात शाहू महाराजांना अभिवादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून शाहू महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी समन्वयक डी. के. गायकवाड, अधिष्ठाता ए. एम. गुरव, पी. डी. राऊत, एस. एस. महाजन, जे. एच. कराडे, एन. बी. गायकवाड, जे. एस. बागी, उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे, पी. एस. पांडव, देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे आदी उपस्थित होते.